**MHKO110002242016**

# नियमित दिवाणी दावा क्र. २६/२०१६.
(CNR No. **MHKO110002242016**)

## निशाणी क्रमांक २०८ व निशाणी क्र.०१ खालील संयुक्तिक आदेश.
(बालेचांद मणेर वि. द्रौपदी बुरुड वगैरे)

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार निशाणी क्र.१८४ वरी आदेशास स्थगिती मिळण्याकरिता केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, वादी यांनी यापूर्वी निशाणी क्र.१२७ नुसार पोलीस संरक्षण मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने दिनांक ०५/०४/२०२२ रोजी नामंजूर केला आहे. त्यानंतर, वादी यांनी सदर आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे रिट पिटीशन क्र. ३१२४/२०२३ दाखल केले होते. सदरचे रिट हे वादी यांनी दिनांक १५/०३/२०२३ रोजी बिनशर्त काढून घेतले आहे. त्यानंतर वादी यांनी निशाणी क्र. १२७ च्या कथनांप्रमाणे तसाच अर्ज निशाणी क्र.१८४ वर दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा दिनांक ०८/०५/२०२५ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२०४ नुसार सदर अदेशाबाबत रिव्ह्यु अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर वादी यांना निशाणी क्र.१८४ वरील आदेशानुसार वडगांव पोलीस ठाण्यात दिनांक ३०/०५/२०२५ रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले. तसेच, वडगांव पोलीस यांनी, न्यायालयाने निशाणी क्र.१८४ वरील आदेशाला स्थगिती देण्यात आलेली नसल्यामुळे नियमाप्रमाणे पोलीस संरक्षण दिले जाईल, असे प्रतिवादी यांना सांगितले. सबब प्रतिवादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०३. प्रतिवादी यांचे पुढे आर्जातील कथन असे आहे की, जर निशाणी क्र.१८४ वरील आदेशाला स्थगिती देण्यात आली नाही तर, वादी हे पोलिसांच्या मदतीने दावा मिळकतीमधील प्रतिवादींचा कब्जा बेकायदेशीररित्या काढून घेतील व त्यामुळे प्रतिवादींची दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाट संपुष्टात येईल. त्यामुळे प्रतिवादींचे अपरिमित नुकसान

होण्याची शक्यता आहे. तसेच वादी यांनी न्यायालयावर दबाव टाकल्यामुळे सदरचा अर्ज हा बेकायदेशीररित्या मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व कारणांसाठी प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१८४ वरील दिनांक ०८/०५/२०२५ रोजीचा अर्ज हा निशाणी क्र.२०४ च्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत स्थगित ठेवण्याबाबत विनंती केली आहे.

०४. वादी यांनी निशाणी क्र.२१६ खाली पुरसीस दाखल करून त्यांनी निशाणी क्र.२०४ च्या अर्जाच्या कामी जे म्हणणे दिले आहे, तेच म्हणणे प्रस्तुत निशाणी क्र.२०८ चे कामी वाचण्यात यावे अशी विनंती केली आहे. वादी यांनी निशाणी क्र.२२० वर निशाणी क्र.२०४ च्या अर्जास त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे.

०५. वादी यांनी त्यांच्या निशाणी क्र.२२० वरील म्हणण्यामध्ये प्रतिवादीच्या सर्व कथनांचा इन्कार करून प्रतिवादीची सर्व कथने खोटी व चुकीची असल्याचे कथन केले आहे. वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुद्ध दाखल केलेला तूर्तातूर्त मनाईचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे. प्रस्तुत तूर्तातूर्त मनाई अर्जावरील प्रतिवादी यांनी दाखल केलेले अपील हे मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांनी नामंजूर केले आहे व त्यानंतर प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीस हरकत व अडथळा निर्माण करून लागल्यामुळे वादी यांनी निशाणी क्र.१८४ नुसार अर्ज दाखल करून पोलीस संरक्षण मिळण्याची विनंती केली. प्रस्तुतचा निशाणी क्र.१८४ वरील अर्ज हा दिनांक ०८/०५/२०२५ रोजी गुणदोषांवर चालून मंजूर करण्यात आला व प्रकरणात पुढे दिनांक २१/०६/२०२५ अशी तारीख ठेवण्यात आली. असे असताना प्रतिवादी यांनी परस्पर काम पटलावर घेण्याचा अर्ज देऊन निशाणी क्र.२०४ अर्ज दाखल केला आहे.

०६. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, निशाणी क्र.१८४ वरील न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध, प्रतिवादी यांच्याकडे अपील दाखल करण्याची तरतूद असताना देखील प्रतिवादी यांनी तसे न करता सदरचा रिव्ह्युचा अर्ज दाखल केला आहे. तसेच, प्रतिवादी यांनी दाखल केलेले सदरचे अर्ज हे केवळ प्रकरणामध्ये विलंब करण्यासाठी दाखल केले आहेत. या सर्व कारणांसाठी वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच प्रकरणातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

०८. प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल अर्जांचा घटनाक्रम पहाणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामी वादीतर्फे दाखल करण्यात आलेला तूर्तातूर्त मनाई अर्ज हा दिनांक १८/०२/२०१७ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर, प्रतिवादी यांनी मा. जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथे दाखल केलेले दिवाणी किर. अपील क्र.९२/२०१७ हे दिनांक २५/०७/२०१९ रोजी नामंजूर करण्यात आले आहे. तसेच, त्यानंतर वादी यांनी निशाणी क्र. १२७ खाली पोलीस संरक्षण मिळण्यासाठी दाखल केलेला अर्ज हा दिनांक ०५/०४/२०२२ रोजी नामंजूर करण्यात आला आहे. वादी यांनी यांनी सदर अर्जावर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल केलेले रिट पिटीशन क्र. ३१२४/२०२३ हे वादी यांनी दिनांक १५/०३/२०२३ रोजी काढून घेतल्याने निकाली करण्यात आले. सदरचे रिट पिटीशन क्र. ३१२४/२०२३ मधील दिनांक १५/०३/२०२३ रोजीचा आदेश हा अभिलेखावर दाखल आहे.

०९. त्यानंतर, वादी यांनी निशाणी क्र.१८४ नुसार दाखल केलेला पोलीस संरक्षणाबाबतचा अर्ज हा दिनांक ०८/०५/२०२५ रोजी मंजूर झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२०४ कडे दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सादर केला. सदर निशाणी क्र.१८४ च्या आदेशाबाबत रिव्ह्यु अर्ज दाखल केला असून सदर अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत निशाणी क्र. १८४ च्या अर्जावरील आदेशास स्थगिती देण्यासाठी प्रस्तुतचा निशाणी क्र.२०८ वरील अर्ज दिनांक ३१/०५/२०२५ रोजी दाखल केला आहे. त्याचप्रमाणे निशाणी क्र.२१३ वर दिनांक १०/०६/२०२५ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम १६ नुसार न्यायालयातील सी.सी.टीव्ही फुटेज हजर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जास वादी यांनी दिनांक १२/०६/२०१७ रोजी म्हणणे सादर केलेले आहे.

१०. त्यानंतर, प्रतिवादी यांनी यादी निशाणी क्र.२१९ सोबत दिनांक १२/०६/२०२५ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश, कोल्हापूर यांच्या न्यायालयात, प्रस्तुतचा दावा क्र. २६/२०१६ हा कोल्हापूर येथील न्यायालयात वर्ग करण्याकरिता अर्ज सादर केला असल्याबाबत अर्जाची प्रत सादर केलेली आहे. त्याचप्रमाणे, रिव्ह्यु अर्ज निशाणी क्र.२०४

वर युक्तिवाद हा निशाणी क्र.२१३ वरील अर्जावरील युक्तिवादानंतर व आदेशानंतर करणार असल्याबाबत प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांनी न्यायालयात सांगितले आहे. मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे दाखल केलेल्या प्रकरण वर्ग करण्याबाबतच्या अर्जामध्ये, न्यायालयातील झालेला दिनांक ०७/०५/२०२५ रोजीचा दंगा, तसेच न्यायाधीशांवर दबाव आणून निशाणी क्र.१८४ वरील अर्ज मंजूर करून घेतल्याबाबतचे कथन नमुद केले आहे.

११. थोडक्यात, न्यायधीशांवरील दबावाबाबत, तसेच अर्जावरील झालेले आदेश हे प्रतिवादींचे प्रमुख आक्षेप असलेले मुद्दे असल्याचे दिसून येते. त्यामुळे, सद्यःस्थितीमध्ये या प्रकरणामध्ये कोणतेही आदेश पारित करणे तर्कसंगत होणार नाही. सबब, मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांच्या समोरील प्रकरण वर्ग करण्याबाबतच्या अर्जावरील आदेश होईपर्यंत ह्या अर्जावर आदेश करणे न्यायोचित होणार नाही. करिता, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांच्या कडील प्रकरण वर्ग करण्याबाबतच्या अर्जावरील आदेश होईपर्यंत प्रस्तुत अर्जावर आदेश करता येणार नाही.

२. उभय पक्षकारांनी याची नोंद घ्यावी.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.06.16 17:48:31 +0530

दिनांक १६/०६/२०२५. **(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**
पेठवडगांव. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठवडगांव.